# भूमिका

# भूमिका

" सुमेध वडावाला (रिसबूड) यांच्या ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीचा अभ्यास " हा विषय एम.फिल. लघुप्रबंधासाठी निवडण्यात आला आहे.

मराठी साहित्य प्रारंभीच्या काळात भाषांतरीत, अनुवादित स्वरूपात होते. या वाङ्मयात कालांतराने विकास होऊ लागला आणि स्वतंत्रपणे मराठी भाषेत साहित्यनिर्मिती होऊ लागली. या काळातील वाङ्मयाला ' आधुनिक वाङ्मय ' असे संबोधले जाऊ लागले. हे वाङ्मय प्रामुख्याने अद्भुतरम्य आणि मनोरंजनात्मक स्वरूपाचे होते. मात्र या वाङ्मयातून काळानुरूप बदल होऊ लागला. त्यातून वास्तवाचे चित्रण होऊ लागले. यात गद्य आणि पद्य अशा दोन्ही प्रकारच्या वाङ्मय प्रकारांचा समावेश होतो. नवा लेखक वर्ग शहरातील, खेडयातील जीवनानुभूती कथा, कादंबऱ्या काव्यातून मांडू लागला होता आणि वाचकांस देखील ही जीवनानुभूती आपलीशी वाटत होती. म्हणून अल्पावधीतच मराठी वाङ्मयात कादंबरी, कथांचे महत्त्व वाढले. या वाङ्मयप्रकारातून मानवी जीवन, संस्कृती, निसर्ग, भाषेची वेगवेगळी रूपे, समाजातील वेगवेगळे स्तर इत्यादी चित्रित होऊ लागले. त्यामुळे कादंबरीचे वेगळेपण सिध्द होऊ लागले.

याच काळात कादंबरी या वाङ्मय प्रकाराचा विस्तार होऊ लागला. ती अद्भुतरम्य व मनोरंजनात्मक रूप सोडून वास्तवतेचे रूप धारण करू लागली. याद्वारे लेखकांनी जीवनाच्या सर्व बाजूंनी वेध घेण्याचा प्रयत्न केला. अनेक विषय सामावत गेले. यापैकीच एक विषय म्हणजे ' महानगरीय जीवन ! ' कादंबरीतून महानगरीय जीवन चित्रित होऊ लागले. अनेक लेखक तेथील समस्या मांडू लागले. या कादंबऱ्यांमध्ये सुमेध वडावाला यांच्या कादंबऱ्या विशेष उल्लेखनीय वाटतात.

सुमेध वडावाला (रिसबूड) यांच्या आतापर्यंत पाच कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. त्यात धर्मयुध्द (१९९२), ब्रह्मकमळ (१९९७), तृष्णा (२०००), देहजावो अथवा जावो (२००५), संदर्भासहीत स्पष्टीकरण (२००६) इत्यादी कादंबऱ्यांचा समावेश होतो.

सुमेध वडावाला (रिसबूड) यांच्या बऱ्याच कादंबऱ्यांना मुंबईची पार्श्वभूमी आहे. या कादंबऱ्यातून समकालीन सामाजिक स्थिती, राजकीय स्थिती, शहरी संस्कृती, तेथील भ्रष्टाचार, मध्यमवर्गीय कुटुंब, झोपडपट्टी, दारिद्र्यमय जीवन आणि स्त्रियांच्या मानसिक तसेच अंतर्मनाचे चित्रण आलेले आहे. प्रस्तुत कादंबरीतून लेखकाने महानगरीय चाळ संस्कृतीत वाढलेल्या तरुणाच्या व्यसनीपणामुळे त्याच्या जीवनाची झालेली वाताहत चित्रित केली आहे. त्याचबरोबर महानगरातील इतरही अनेक प्रकारचे जीवन चित्रित झाले आहे. म्हणून डॉ.वि.दा.वासमकर यांच्या मार्गदर्शनाखाली " सुमेध वडावाला (रिसबूड) यांच्या ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीचा अभ्यास " हा एम.फिल. परीक्षेसाठी विषय निवडला.

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्रीय पध्दतीचा वापर केला आहे. त्यासाठी अभ्यासाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे निश्चित केली आहेत.

१. कादंबरीचा एक वाङ्मय प्रकार म्हणून आढावा घेणे व सुमेध वडावाला यांचे कथात्मक लेखन समजून घेणे.

२. सुमेध वडावाला (रिसबूड) यांच्या लेखनाचे समाज वास्तव प्रस्तुत कादंबरीच्या आशयसूत्राद्वारे शोधणे.

३. सुमेध वडावाला (रिसबूड) यांच्या कादंबरीतील व्यक्तिरेखांचा अभ्यास करणे.

४. शेवटी सुमेध वडावाला (रिसबूड) यांच्या कादंबरीचे वाङ्मयीन विशेष शोधणे.

प्रस्तुत लघुप्रबंधाची प्रकरण विभागणी खालीलप्रमाणे करून अभ्यास करण्यात आला आहे.

१. कादंबरी : एक वाङ्मयप्रकार आणि सुमेध वडावाला (रिसबूड) यांचे कथात्मक लेखन.

२. ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीची आशयसूत्रे.

३. ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीतील व्यक्तिरेखा.

४. ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीचे वाङ्मयीन विशेष.

५. उपसंहार

शेवटी परिशिष्टांमध्ये संदर्भग्रंथांची व नियतकालिकांची सूची देण्यात आलेली आहे.

- योगेश्वर चव्हाण